aglasem.com

FOR KARNATAKA CLASS 10 PREPARATION

Karnataka SSLC Model Question Paper 2027 for Marathi First Language (Paper 1)

EXAM	YEAR	TYPE	SUBJECT
Karnataka Class 10	2027	Sample Paper	Marathi

08-M

ಕರ್ನಾಟಕ ಶಾಲಾ ಪರೀಕ್ಷೆ ಮತ್ತು ಮೌಲ್ಯನಿರ್ಣಯ ಮಂಡಲಿ
ಮಲ್ಲೇಶ್ವರಂ, ಬೆಂಗಳೂರು - 560 003

KARNATAKA SCHOOL EXAMINATION AND ASSESSMENT BOARD
Malleshwaram, Bengaluru - 560 003

2026 - 27 ರ ಎಸ್.ಎಸ್.ಎಲ್.ಸಿ. ಮಾದರಿ ಪ್ರಶ್ನೆಪತ್ರಿಕೆ – 1

S.S.L.C. MODEL QUESTION PAPER - 1 : 2026 - 27

ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ

Subject : First Language — MARATHI

ವಿಷಯ ಸಂಕೇತ : **08-M** | **Subject Code : 08-M**

ಸಮಯ : 3 ಗಂಟೆ 15 ನಿಮಿಷಗಳು] | [Time : 3 Hours 15 Minutes

ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : **100**] | [Max. Marks : **100**

विद्यार्थ्यांना सामान्य सूचना :

1. प्रश्नपत्रिकेमध्ये एकूण 45 प्रश्न आहेत.
2. प्रश्नांसाठी दिलेल्या सूचनांचे पालन करा.
3. उजव्या बाजूच्या कडेला (काठावर) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.
4. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्नपत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटेही दिलेली आहेत.

(Turn over)

aglasem.com For more Question Papers, Sample Papers, Notes & Syllabus visit aglasem.com

08-M

I. पुढील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा. **6x1=6**

1. 'दुर्बळ' या शब्दाचा संधीविग्रह असा होतो -

   (अ) दु : + बळ (ब) दु + बळ

   (क) दे + बळ (ड) दुर + ळ

2. 'अदिती अभ्यास करत आहे.' या वाक्यातील काळ ओळखा.

   (अ) भुतकाळ (ब) भविष्यकाळ

   (क) वर्तमानकाळ (ड) अपूर्ण भविष्यकाळ

3. 'पंचवटी' हे या समासाचे उदाहरण आहे -

   (अ) अव्ययीभाव समास (ब) बहुव्रीही समास

   (क) द्वंद्व समास (ड) द्विगू समास

4. 'जोपर्यंत आपल्याकडे पैसा आहे, तोपर्यंत अनेक माणसे गोळा होतात' या अर्थाची म्हण ही आहे -

   (अ) चोराच्या मनात चांदणे (ब) खाई त्याला खवखवे

   (क) असतील शिते तर जमतील भुते (ड) अति तेथे माती

5. 'पंधरा दिवसातून एकदा प्रसिध्द होणारे' या शब्दसमुहासाठी एक योग्य शब्द हा आहे-

   (अ) दैनिक (ब) पाक्षिक

   (क) वार्षिक (ड) मासिक

6. 'पक्षी झाडावर बसला आहे.' या वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ही आहे -

   (अ) शब्दयोगी अव्यय (ब) उभयान्वयी अव्यय

   (क) केवलप्रयोगी अव्यय (ड) क्रियापद

08-M

II) पहिल्या दोन पदांचा संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा संबंधित शब्द लिहा. 4 x 1 = 4

7. ने, ए, शी : तृतीया विभक्ती : : ऊन, हुन : .....

8. आराध्या गाणे गाते : कर्तरी प्रयोग : : पोलीसांनी चोर पकडला : .....

9. परिणय : विवाह : : नृप : .....

10. ज्ञानी : अज्ञानी : : उत्तीर्ण : .....

III. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा. 7 x 1 = 7

11. बोक्याने आपली एकादशी कशी मोडली ?

12. जपानी स्त्री कशी आहे ?

13. 'नोकर? छे, मालक !' या पाठाचे मूल्य कोणते?

14. संत ज्ञानेश्वरांच्या ओवीचा गौरव कसा केला जातो ?

15. विरहिणी म्हणजे काय ?

16. लोकसेवेत मग्न असणाऱ्यांना कशाची पर्वा नसते ?

17. भर दुपारी कोणाची रांग लागते ?

IV. खालील प्रश्नांची सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. 3 x 2 = 6

18. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

    अ) विराजमान होणे

    ब) याचना करणे

19. अलंकार ओळखून लक्षणे लिहा :

    "संभ्रमी त्या जाहले कृष्णापरी जे सारथी."

20. गण पाडून वृत्त ओळखा.

    "घालील धाड शिशुपाल कळे न केव्हा"

08-M

V. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा. **7 x 2 = 14**

21. डोळस मनुष्य आंधळ्यांना काय म्हणाला?
22. 'विद्या ही महासागरासारखी आहे' असे आंबेडकर का म्हणतात ?
23. "छत्री, छप्पर मुर्दाबाद!" संदर्भासह स्पष्टीकरण करा.
24. रा.रं. बोराडे यांचा परिचय लिहा.
25. "हं हळू बोल तनयाते" संदर्भासह स्पष्टीकरण करा.
26. इंद्रजित भालेराव यांचा परिचय लिहा.
27. भुके जीव काय करतील असे कवी म्हणतो?

VI. खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा. **1 x 3 = 3**

28. अ) देव तारी त्याला कोण मारी

किंवा

ब) जया अंगी मोठेपण, तया यातना कठीण

VII. खालील प्रश्नांची पाच-सहा वाक्यात उत्तरे लिहा. **10 x 3 = 30**

29. वसईचा किल्ला घेण्यासाठी चिमाजीअप्पांनी कोणकोणते प्रयत्न केले?
30. 'जपानी स्त्री' या पाठाच्या आधारे जपानी स्त्रीचे स्वभाववैशिष्टे लिहा.
31. शिबिरं घेण्यासाठी येणारे शिक्षक नाखूष का असत?
32. सावित्रीबाई खऱ्या अर्थाने सहधर्मचारिणी कशा होत्या ते स्पष्ट करा ?
33. 'आई समजून घेताना' या पाठातील दुसऱ्या प्रसंगातून लेखकाने आईला कसे समजून घेतले?
34. आपणास श्रीकृष्णाला मनाने वरले आहे हे रुक्मिणी त्याला कसे सांगते?
35. 'जरा तरी समज धरी अंतरी' असे कवी का म्हणत आहे?
36. पृथ्वीचे प्रेम मिळावे म्हणून शुक्र, धुमकेतू, मंगळ ग्रह कशाप्रकारे याचना करीत आहेत?
37. सैनिक, देशभक्त व समाजसेवक यांचे गुणगान का केले पाहिजेत?
38. 'धरण' कवितेच्या आधारे स्त्रियांच्या कष्टाचे वर्णन करा.

08-M

VIII. खालील प्रश्नांची आठ-दहा वाक्यात उत्तरे लिहा. **4 x 4 = 16**

39. पिंपळ व जांभूळ या झाडाबद्दल लेखकाने कोणत्या आठवणी सांगितल्या आहेत ?

किंवा

जंगलातील पानगळीच्या दिवसात कोणते दृश्य दिसते? त्याचे वर्णन करा.

40. गंगूबाईंनी संगीत शिक्षणासाठी कशाप्रकारे कष्ट घेतले?

किंवा

बेळगावी काँग्रेसच्या अधिवेशनातील घटनांचे वर्णन करा.

41. 'सत्कार' कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

42. खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा.

सकलास कळो .....

.....

..... हो आम्ही.

किंवा

सौंदर्य रमो .....

.....

..... वरचि असा दे.

08-M

IX. खाली दिलेला उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा. 1 x 4 = 4

(2+2)

43. भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नाही, तर ती मानवी संस्कृतीचा आणि इतिहासाचा आरसा आहे. कोणत्याही समाजाची खरी ओळख त्याच्या मातृभाषेतून होते. आजच्या जागतिकतेच्या युगात इंग्रजी किंवा इतर परदेशी भाषा शिकणे गरजेचे आहे, हे नाकारता येत नाही ; परंतु परकीय भाषेच्या मोहापायी स्वत:च्या मातृभाषेकेडे दुर्लक्ष करणे चुकीचे आहे. मातृभाषा हे आईसारखी असते, ती आपल्या विचारांना पहिली प्रगल्भता देते. जर आपली भाषाच संपली, तर त्या भाषेतील साहित्य, लोकसंस्कृती आणि पूर्वजांचे ज्ञानही नष्ट होईल. भाषा जिवंत राहते ती बोलण्याने, लिहिण्याने, वाचण्याने. आजच्या तरुण पिढीने मातृभाषेचा न्यूनगंड न बाळगता तिचा अभिमानाने वापर केला पाहिजे. जोपर्यंत घरोघरी आणि दैनंदिन व्यवहारात मातृभाषेचा वापर होणार नाही, तोपर्यंत तिचे संवर्धन केवळ कागदावरच राहील. परकीय भाषांची ज्ञानखिडकी उघडी ठेवावी, पण आपल्या संस्कृतीचा पाया असलेली मातृभाषा कधीही विसरु नये.

प्रश्न :

अ) परकीय भाषेच्या मोहापायी मातृभाषेकडे दुर्लक्ष करणे चुकीचे का ठरते ?

ब) भाषा संवर्धनासाठी आपण काय केले पाहिजे ?

X. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा. 1 x 5 =5

44. तुमच्या मित्राला / मैत्रिणीला शिक्षणाचे महत्त्व सांगणारे पत्र लिहा.

किंवा

शाळा सोडल्याचा दाखला मिळविण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापकांना अर्ज लिहा.

XI. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंधनलेखन करा. 1 x 5 = 5

45. अ) माझा आवडता समाजसुधारक

ब) विद्यार्थी जीवनातील सदाचाराचे महत्त्व

❑❑